जा.क्र:- नाजिसुरमं/अध्यक्ष/वि.भ.२०२१/...३०३

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दूरध्वनी क्र : ०२५३-२५९००३१.

दिनांक : ०८/०२/२०२१

**<u>आदेश</u>**

**विषय :-सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/मुख्य सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक यांचे विषेशभत्ता/महागाई भत्त्यामध्ये दि. ०१/०१/२०२१ पासून सुधारणा बाबत..**

**संदर्भ** : क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२०-२/कार्या-१०/९२० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्त्याची रक्कम दि. ०१.०१.२०२१ ते दि. ३०.०६.२०२१ या कालावधीकरिता जाहीर करण्या बाबतचे दि. ०५.०२.२०२१ रोजीचे पत्र.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत **सुट प्राप्त** सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार " **महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत)** २००२ **मधील खंड** ३० **मध्ये**" नमूद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या रोजगारासाठी पुनर्निर्धारित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर आधारभूत प्रमाण मानून मंडळाने यापूर्वी मान्य केलेले आहेत. त्यानुसार उक्त अनुसुचित उद्योगधंद्यासाठी शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला विषेश भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना वेळोवेळी लागू करण्यात येत आहे.

क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२०-२/कार्या-१०/९२० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्त्याची रक्कम दि. ०१.०१.२०२१ ते दि. ३०.०६.२०२१ या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेली आहे. त्यानुसार "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता **दि. ०१.०१.२०२१ ते ३०.०६.२०२१** या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेले विशेष भत्त्याचे दर नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक या मंडळाच्या नोंदणीकृत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/ मुख्य सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक यांना लागू राहतील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. ०१/०१/२०२१ पासून ते ३०/०६/२०२१ पर्यंत सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ.क्र. | पद | मुळवेतन | विषेशभत्ता/ महागाईभत्ता | घरभाडेभत्ता (३+४) ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | ११६३२ | १०९२ | ६३६ | १३०० | २९४ | ३०० | १५२५४ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १०८५६ | १०९२ | ५९७ | १३०० | २९४ | ३०० | १४४३९ |
| ३ | सुरक्षा रक्षक | १००२१ | १०९२ | ५५६ | १३०० | २९४ | ३०० | १३५६३ |

..२..

* किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक / **मुख्य** सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/यांना पुढील प्रमाणे इतर फायदे/लाभ देणे बंधन कारक आहे.

१) **सानुग्रह अनुदान** : किमान वेतनाच्या १०% २) **उपदान** : किमान वेतनाच्या ४ % ३) **भरपगारी रजा** : किमान वेतनाच्या ६ % ४) **भरपगारी सुट्टी** : किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात आर.टी.जी.एस. / DD द्वारे/ धनादेशा द्वारे जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांना दि. ०१/०[illegible]/२०२१ पासून ते दि. ३०/०६/२०२१ पर्यंत सुधारीत वाढीव वेतनासह व विषेश भत्ता/महागाई भत्त्याच्या फरकासह रक्कम विनाविलंब सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांना अदा करावी. तसेच सुधारीत वेतनाबाबत प्रशासकीय सुट प्राप्त लेव्हीच्या फरकाची रक्कम मंडळाकडे विनाविलंब जमा करावी.**

सहाय्यक कामगार आयुक्त व अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,
नाशिक.

प्रति,
____________________
____________________
____________________
____________________